# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com वेब साईट क्रमांक www.dydepune.com


जा.क्र.उमाशि-३/११ वी ऑनलाईन

प्रवेश/पुवि/२०१५ ६७८८७१८८

दिनांक : ३१/३/२०१५

13 1 MAR 2015

प्रति

**प्राचार्य,**
**सर्व कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, पुणे**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसर**

**विषय : इयत्ता ११ वी ऑनलाईन पध्दतीने केंद्रिय प्रवेश सन २०१५-१६ सहविचार सभा.**

**संदर्भ :- या कार्यालयाकडील जा.क्रं.उमाशि-१/पुवि/ऑनलाईन प्रवेश/२०१५-१६/५६६०-६२ दिनांक १६/३/२०१५**

उपरोक्त विषयाबाबत गतवर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी चे प्रवेश **ऑन लाईन** पध्दतीने करण्यात येणार आहेत. या संदर्भात इ. ११ वी केंद्रिय प्रवेश समितीची सहविचार सभा दिनांक १८/२/२०१५ व ९/३/२०१५ रोजी झाली. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश प्रक्रियेबाबत काही स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या सूचनांबाबत समितीच्या सहविचार सभेमध्ये चर्चा झाली. स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना केंद्रिय प्रवेश समितीने घेतलेल्या बैठकीमधील निर्णयानुसार सन २०१५-१६ या वर्षाच्या इ. ११वी ऑनलाईन प्रवेशासंबंधी परवानगी मिळणेबाबत संदर्भीय पत्रान्वये प्रस्ताव सादर केलेला आहे.

केंद्रिय प्रवेश प्रक्रियेबाबत पुढील नियोजन व संभाव्य वेळापत्रक निश्चित करुन त्यानुसार कराव्या लागणा-या कार्यवाहीस मान्यता घेणे कामी केंद्रिय प्रवेश समिती बैठक ए. व्ही. हॉल, आबासाहेब गरवारे कॉलेज, कर्वेरोड, पुणे येथे दिनांक ७/४/२०१५ रोजी १०.१५ वाजता आयोजित केले आहे.सर्व समिती सदस्यांनी सदर बैठकीस व्यक्तिशः उपस्थित रहावयाचे आहे.याची नोंद घ्यावी.

तसेच अनुषंगाने सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाच्या इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व कटक मंडळे क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापक, माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा प्राचार्य, वरिष्ठ महाविद्यालय संलग्न महाविद्यालय प्राचार्य यांची सहविचार सभा दिनांक ७/४/२०१५ रोजी खालील दोन सत्रात झोननिहाय सहविचार सभा 'असेंब्ली हॉल,' आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे' येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर सहविचार सभेस उपस्थित राहणे अपरिहार्य आहे. अनुपस्थित राहणा-यावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com वेब साईट क्रमांक www.dydepune.com


| झोन.क्रं. | झोनचे नांव | दिनांक | बैठकीचे वेळ | बैठकीचे स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे शहर | ०७/०४/२०१५ | ११.३०वाजता | 'असेंब्ली हॉल,' आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे' |
| २ | कर्वेनगर / कोथरुड | | | |
| ३ | पर्वती/स्वारगेट/धनकवडी | | | |
| ६ | हडपसर | | | |
| ७ | शिवाजीनगर /औंध पाषाण | | | |
| ४ | सिंहगड रोड | ०७/०४/२०१५ | ३.०० वाजता | |
| ५ | कॅम्प/ येरवडा | | | |
| ८ | पिंपरी भोसरी[redacted] | | | |
| ९ | चिंचवड निगडी | | | |

सदर परिपत्रक या कार्यालयाच्या (www.dydepune.com) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

(दिनकर टेमकर)
अध्यक्ष
इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती
तथा
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत- मा. शिक्षण संचालक, (माध्य व उच्च माध्य) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत - शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

प्रत - कार्याध्यक्ष तथा प्राचार्य, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे
कृपया सदर मूख्याध्यापक सभेसाठी "असेंब्ली हॉल" येथे आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात.